# निविदा
# भाषा संचालनालय, मुंबई
## महाराष्ट्र राज्य

भाषा संचालनालय, मुंबई या कार्यालयाचे शासन शब्दकोश भाग-१ या भ्रमणध्वनी उपयोजक गुगल प्ले-स्टोअरवर कार्यान्वित करणे, आवश्यक डेटा सर्व्हरवर उपलब्ध करून देण्यासाठी सर्व्हर स्पेस घेणे तसेच भ्रमणध्वनी उपयोजकाचे परिरक्षण प्रयोजनासाठी वार्षिक परिरक्षण करार करणे यांसाठी खुल्या बाजारातून सॉफ्टवेअर कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रयोजनासाठी, दि. २०.११.२०२५ ते दि. २१.११.२०२५ या दोन दिवसांत तपशीलवार दरपत्रके सादर करावीत. त्यासोबत या कामाचा पूर्व अनुभव व प्रमाणपत्रे सादर करावीत. शासन शब्दकोश भाग-१ या भ्रमणध्वनी उपयोजकासाठी दरपत्रके सादर करताना, सॉफ्टवेअर कंपन्यांनी उपयोजकासाठी पुढील महत्त्वाच्या सूचना तसेच खाली नमूद केल्याप्रमाणे “प्रमाण विनिर्देश” (Standard Specifications) यांच्या अनुषंगाने बंद पाकीटात दरपत्रके सादर करावी. तसेच, सॉफ्टवेअर कंपन्यांनी त्यांच्या एकूण क्षमता व अनुभव नमूद करून सदर दरपत्रके या कार्यालयास दिनांक २१.११.२०२५ पर्यंत पाठवावी.

**१. ॲप्लिकेशन कार्यक्षमता व स्थैर्य तपासणी:**

* ॲपचे नियमित हेल्थ चेकअप (लोडिंग वेळ, कार्यक्षमता, शोध प्रणालीची गती, UI/UX चाचणी).
* संभाव्य बग्स, क्रॅश रिपोर्टस् व परफॉर्मन्स इश्यूजचे निराकरण.

**२. सर्व्हर, API आणि Backend मॉनिटरिंग:**

* NET Backend व MSSQL डेटाबेसची नियमित तपासणी.
* डेटाबेस ऑप्टिमायझेशन, इंडेक्सिंग, बॅकअप व्यवस्थापन.
* API प्रतिसाद वेळ व सर्व्हर अपटाइम मॉनिटरिंग.

**३. शब्दसंग्रह (Dictionary Data) व्यवस्थापन:**

* कोषांमधील डेटाची शुद्धता व अद्ययावतता तपासणे.
* शोध प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास त्यांचे निराकरण.

**४. डिव्हाइस Compatibility व OS अपडेट्स:**

* Android च्या नवीन आवृत्त्यांनुसार ॲपची चाचणी.
* नवीन मोबाईल मॉडेल्स व विविध स्क्रीन आकारांवर तपासणी.

**५. सुरक्षा (Security) तपासणी:**

* SQL Injection, unauthorized access यांवर नियमित ऑडिट.
* आवश्यक सुरक्षा पॅचेस लागू करणे.

**६. प्ले स्टोअर व्यवस्थापन:**

* ॲप अपडेट्स, डेव्हलपर पॉलिसी बदलांनुसार सुधारणा.

**७. वापरकर्ता सहाय्य (User Support):**

* वापरकर्त्यांकडून आलेल्या तांत्रिक अडचणींचे निराकरण.

**८. कार्यप्रदर्शन अहवाल:**

* ॲप परफॉर्मन्स, सर्व्हर हेल्थ, डेटाबेस स्थिती यांचे नियमित अहवाल.

**९. सूक्ष्म सुधारणा (Minor Enhancements):**

* UI/UX सुधारणा, शोध गती सुधारणा इत्यादी.

**दरकरारासाठी अटी व शर्ती :-**

१. भ्रमणध्वनी उपयोजकाच्या तपशीलात नमूद केल्याप्रमाणे हा करार सेवासंविदा पद्धतीने करण्यात येईल.

२. भ्रमणध्वनी उपयोजक गुगल प्ले-स्टोअरवर उपलब्ध करून देण्यासाठीच्या खर्चाची रक्कम व भ्रमणध्वनी उपयोजकास लागणारा आवश्यक डेटा सर्व्हरवर ठेवण्याकरिता येणाऱ्या खर्चाची रक्कम विहित कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपणास प्रदान करण्यात येईल.

३. सदर सेवासंविदा करारपत्राचा कालावधी दि.२४.११.२०२५ ते दि.२५.११.२०२८ असा राहील.

४. शासन व्यवहार कोश भाग-१ या भ्रमणध्वनी उपयोजकाचा उपरोक्त कालावधीसाठी वार्षिक परिरक्षण कराराच्या संपूर्ण कालावधीत शासन व्यवहार कोश भाग-१ या भ्रमणध्वनी उपयोजकासंबंधी कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीचे निवारण तीन दिवसांत करणे बंधनकारक राहील.

५. कराराच्या कालावधीत अपूर्ण राहिलेली कामे तद्नंतर पूर्ण करून देणे बंधनकारक राहील.

६. उपरोक्त प्रमाणे कंपनीची सेवा असमाधानकारक झाल्याचे दिसून आल्यास एका महिन्याच्या सूचनेद्वारे सदर सेवा संविदा करार रद्द करण्यात येईल.

७. या कामाचा पूर्व अनुभव असलेल्या व यशस्वीपणे काम केलेल्या सेवा पुरवठादार संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.